सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२६, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. पीईक्यू-०२२६/प्र.क्र.९०/पोल-४, दि. १२/०३/२०२६.

**विषय** :- महासंचालक,अॅन्टी करप्शन ब्युरो, म.रा.मुंबई यांच्या आस्थापनेवरील एकूण २० अस्थायी पदांना दि. ०१.०३.२०२६ ते दि. ३१.०८.२०२६ पर्यंत मुदतवाढ मिळणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. पीईक्यू-०२२६/प्र.क्र.९०/पोल-४, दि. १२/०३/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३१२१६१३३३९२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by Kalpana Kisan Lokhande
Date: 17-03-2026 12:24:37

( कल्पना लोखंडे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) (अति.कार्य.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
कार्यासन अधिकारी, का. क्र. २६-ब.

प्रत,
पोलीस महानिरीक्षक(नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य ,मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (पुनर्रचना).

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो,म.रा.,मुंबई यांच्या आस्थापनेवरील एकूण २० अस्थायी पदांना दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्रशासन**
**गृहविभाग**
**शासन निर्णय क्र.पीईक्यू- ०२२६/ प्र.क्र.९०/ पोल-४**
दुसरा मजला,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांक: १२ मार्च,२०२६

<u>वाचा:-</u> १) गृह विभाग, शासन निर्णय क्र.एमटीएस-०३२५/ प्र.क्र.१४९/ पोल-४,दि.२३.०९.२०२५
२) पोलीस महानिरीक्षक (नि.व स),पोमसं/२६ब/ॲकब्यु/वा.चालक पदे/मुदतवाढ/ ०६/ २०१५,दि.१३.०२.२०२६ चे पत्र.
३) वित्त विभाग,शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क.,दि.२८.०२.२०२६

**<u>शासन निर्णय</u> :-**

महासंचालक,ॲन्टी करप्शन ब्युरो,म.रा.,मुंबई यांच्या आस्थापनेवरील एकूण २० वाहन चालक अस्थायी पदांना संदर्भ क्र १ येथील शासन निर्णयान्वये दि.०१.०९.२०२५ ते दि.२८.०२.२०२६ पर्यत वित्त विभागाने दिलेल्या अटीच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यात आलेली आहे.उपरोक्त नमूद संदर्भ क्र. ३ येथील वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यत अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याचे अधिकार मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेले आहे.उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये, महासंचालक,ॲन्टी करप्शन ब्युरो,म.रा.,मुंबईयांच्या आस्थापनेवरील एकूण २० अस्थायी पदांना दि.०१.०३.२०२६ पासून पुढील मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुषंगाने या शासन निर्णयासोबतच्या सहपत्रात नमुद केलेल्या महासंचालक,ॲन्टी करप्शन ब्युरो,म.रा.,मुंबई यांच्या आस्थापनेवरील एकूण २० वाहन चालक अस्थायी पदांना दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यंत खालील अटीच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तावित करण्यात आलेल्या पदांपैकी कोणतेही पद सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ रिक्त नाही व पदे ज्या कारणासाठी अटी व शर्तीचे अधीन राहून मंजूर केली आहेत त्यांचे पालन करण्यात आले आहे.

२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/ प्र.क्र.८/ १६/ आ.पु.क., दि.२८.०२.२०२६ नुसार विहित केलेल्या अटींचे व शर्तीचे कटाक्षाने पालन करण्यात येईल व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

३) दरम्यानच्या काळात आपल्या कार्यालयाच्या अस्थापनेवरील मंजूर पदांचा आढावा घेऊन सुधारीत आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. यानंतर, **सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्याकरीता कालावधी वाढवून देण्यात येणार नाही.** त्यानुसार सुधारीत आकृतीबंधाचा प्रस्ताव तातडीने वित्त विभागास सादर करण्याचे नियोजन करुन त्वरीत कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना द्याव्यात. सुधारीत आकृतीबंध निश्चित झाला नसल्याने अस्थायी पदांना यापुढे मुदतवाढ न मिळाल्यामुळे अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतन व भत्यांचा प्रश्न निर्माण झाल्यास ती जबाबदारी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांची राहील.

२. सदर प्रकरणी होणाराखर्च गृहविभाग, मागणीक्रमांक : बी-१ लेखाशिर्ष "२०५५-पोलीस- १०१(३) ॲन्टी करप्शन ब्युरो" या लेखाशीर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/ आ.पु.क., दि.२८.०२.२०२६ अन्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमितकरण्यातयेतआहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३१२१६१३३३९२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

ARCHANA VILAS WALZADE

Digitally signed by ARCHANA VILAS WALZADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=C425B577C1B133FB91A3D8759411F27689C7C6E2480079FC88B0322C01CFD264, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B4E19876AB3EEC36E3A3B988441648AB87470CDFE66B14CFBE7AC9BD770485C1, cn=ARCHANA VILAS WALZADE
Date: 2026.03.12 16:14:43 +05'30'

**( अर्चना वालझाडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२. महासंचालक,ॲन्टी करप्शन ब्युरो,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. महालेखापाल,महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता),मुंबई-१.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. वित्तविभाग (आ.पु.क.),मंत्रालय, मुंबई.
७. कार्यासन अधिकारी (पोल-३),गृहविभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती/गृह विभाग, पोल-४.

गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीईक्यू-०२२६/प्र.क्र.९० /पोल-४, दि. १२ /०३ /२०२६ सोबतचे विवरणपत्र

महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील २० अस्थायी पदांना मुदतवाढ देणेबाबत.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | पद निर्मितीचा शासन निर्णय | अस्थायी पदांना मुदतवाढ मिळाल्याचा यापुर्वीचा शासन निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | पोलीस शिपाई वाहन चालक | ८ | क्र.एमटीएस-१०९२/४३०/(२९)/पोल-४, दि.०८.०७.१९९३ | शा.नि.क्र.पीएलएफ-०३२२/ प्र.क्र.३२०/ पोल-४, दि. २३.०९.२०२५ |
| २ | पोलीस शिपाई वाहन चालक | ६ | क्र.एमटीएस-१०९३/२४००/(२५)/पोल-४, दि.१२.०९.१९९५ | |
| ३ | पोलीस शिपाई वाहन चालक | ६ | क्र.एमटीएस-१०९६/२७२३/न.बा.२८/पोल-४, दि.०१.०८.१९९७ | |
| | एकूण | २० | | |